# वयात येतानाचे धोके याविषयी मार्गदर्शन

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

पंख संस्था, क्विकहील फाउंडेशन आणि खडक पोलिस स्टेशन यांच्यातर्फे अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त शिवाजी मराठा कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता १२वीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

पोलिस अधिकारी उत्तम चक्रे यांनी विद्यार्थ्यांना 'वयात येतानाचे धोके आणि व्यसने' या विषयावर मार्गदर्शन केले. पंख संस्था अध्यक्ष स्मिता आपटे यांनीही मुलांना माहितीपर मार्गदर्शन केले. व्यसनाधीनता, त्याचे प्रकार आणि त्यातील धोके याबद्दल पंख संस्थेचे समुपदेशक कौस्तुभ जोगळेकर यांनी मुलांना माहिती दिली. व्यसनांपासून दूर राहण्यासाठीची प्रतिज्ञा मुलांनी सांगतेवेळी सादर केली.

क्विकहील फाउंडेशनचे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी विभागाचे प्रमुख अजय शिर्के, पंख संस्थेच्या अध्यक्ष स्मिता आपटे, शाळेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

